# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

दुरध्वनी क्र. : २६४७४२११/२६४७२१३१
वि.क्र. ३६२४
फॅक्स क्र. : (०२२) २६४७७४७१

महावितरण

**शिस्तभंग कारवाई कक्ष**
"प्रकाशगड", ४ था मजला,
अनंत काणेकर मार्ग,
स्टेशन रोड, बांद्रा (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

क्र.मासं/शिनि-३/ 11164

दिनांक : 11 NOV 2013

प्रति,
मुख्य अभियंता,
म.रा.वि.वि.कं.मर्या.,
अमरावती परिमंडळ, अकोला/ कोल्हापुर परिमंडळ, कोल्हापुर/लातुर परिमंडळ, लातुर/भांडुप परिमंडळ, भांडुप / कल्याण परिमंडळ,कल्याण/पुणे परिमंडळ, पुणे/ कोकण परिमंडळ,रत्नागिरी/ बारामती परिमंडळ, बारामती/ जळगाव परिमंडळ, जळगाव/नांदेड परिमंडळ, नांदेड/नागपुर (शहर) परिमंडळ/नागपुर (ग्रामिण) परिमंडळ / नाशिक परिमंडळ, नाशिक/औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद. / स्थापत्य विभाग मुंबई / टि ॲण्ड सी एकलहरे नाशिक / एम.एम.सेल मुंबई

**विषय :-** सेवाविनियम क्र. ९० अंतर्गत संक्षिप्त कार्यवाही बाबत.

--------------------

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते कि, मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र. ३१२६/२०११ अन्वये दाखल केलेल्या याचिकेमध्ये सेवाविनियम क्र. ९० संक्षिप्त कार्यवाही संदर्भात असलेल्या नियमास मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद यांनी दि. २२/०८/२०१३ च्या आदेशान्वये म.रा.वि.वि.कर्मचारी सेवा विनियमातील संक्षिप्त कार्यवाही संदर्भातील विनियम क्र. ९० रद्दबादल ठरविले आहे.

या प्रकरणी मुख्य कार्यालयाने उच्च न्यायालय औरंगाबाद, औरंगाबाद खंडपीठाच्या निर्णयाविरुध्द सर्वोच्च न्यायालयात अपील सादर करण्याचे निश्चित केले आहे. त्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय लागेपर्यंत सेवाविनियम क्र. ९० मधील तरतूदीची अंमलबजावणी करण्यास स्थगिती देण्यात येत आहे. प्रलंबित प्रकरणाबाबत तसेच लाचलुचपत प्रतिबंधक प्रकरणी हयापुढे अनुसरावयाच्या कार्यपध्दती बाबत मुख्य विधी सल्लागार यांनी प्रादेशिक कार्यकारी संचालक-१, कल्याण परिक्षेत्र कल्याण हया कार्यालयास दिलेल्या मार्गदर्शक तत्वाची प्रत हया पत्रासोबत जोडून पाठवित आहे.

तरी सर्व क्षेत्रिय कार्यालयांना सुचित करण्यात येते कि, मुख्य विधी सल्लागार यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचना नुसार पुढील आदेशापर्यंत निर्देशित कार्यवाही अनुसरावी. तसेच सदरील बाब आपल्या परिमंडळातंर्गत सर्व मंडल कार्यालये व विभागीय कार्यालयाच्या निदर्शनास आणून द्यावी.

सहपत्र : मुख्य विधी सल्लागार यांचे पत्र.

(संदेश हाके)
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

प्रत सविनय सादर:-

१) कार्यकारी संचालक (मासं), म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रकाशगड, मुंबई.
२) प्रादेशिक कार्यकारी संचालक (१,२,३), म.रा.वि.वि.कं.मर्या., पुणे /कल्याण/नागपुर.

- माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सादर.

MAHAVITARAN

Maharashtra State Electricity Distribution Company Limited.

C/1

No: Legal / L/D/1338/28931 Date: 19 OCT 2013

प्रति,
प्रादेशिक कार्यकारी संचालक -1,
कल्याण परिक्षेत्र, म.रा.वि.वि.कं.म.,
कल्याण

शिस्तभंग कारवाई कक्ष
आवक क्र. 5282 /दिनांक 23/10/13

विषय : सेवाविनियम 90 संदर्भात स्पष्टीकरण

संदर्भ : प्रादेशिक कार्यकारी संचालक 1 यांचे पत्र क.मासं/00571 दि.19.10.2013

औरंगाबाद खंडीपीठाच्या दि.22.08.2013 आदेशाव्दारे मराविविकं कर्मचारी सेवाविनियममतील विनियम क.90 (संक्षिप्त कार्यवाही) रद्दबादल करण्यात आला आहे त्यानुषंगाने सद्य स्थितीत ज्या कर्मचाऱ्यांवर सेवाविनियम 90 अनुसार या पूर्वीच आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. त्यांचे बाबत सद्य स्थितीत काय कार्यवाही अनुसरावी याबाबत प्रादेशिक कार्यकारी संचालक 1 यांनी उपरोक्त संदर्भीय पत्राव्दारे मार्गदर्शन मागितले आहे.

न्यायालयीन आदेशाव्दारे सेवाविनियम 90 रद्दबादल ठरल्याने पुढे निर्देशित कार्यवाही अनुसरणे क्रमप्राप्त आहे.

1. ज्या कर्मचाऱ्यावर सेवाविनियम 90 अन्वये आरोपपत्र दाखल केले गेले आहे व ज्या आरोपपत्रांवरील कारवाई आज अखेर प्रलंबित आहे अशी सर्व आरोपपत्रे त्या त्या सक्षमअधिकाऱ्याकडून प्रशासकीय करण्यास्तव मागे घेण्यात यावी.

2. प्रशासकीय कारणास्तव सेवाविनियम 90 अन्वये दिलेले आरोपपत्र मागे घेण्यात आले तरीही आरोपांचे गांभीर्य लक्षात घेउन सेवाविनियम 88 अन्वये कसुरदार कर्मचाऱ्यावर गैरवर्तणुकीबद्दल सविस्तर आरोपत्र बजावण्यात यावे व त्यानंतर सेवाविनियम 88 अन्वये निर्देशित केल्याप्रमाणे कार्यवाही पूर्ण करावी.

3. कर्मचाऱ्यांच्या विरुध्द पुरेसा परिस्थितीजन्य पुरावा उपलब्ध असल्याने निलंबन करण्यात आले आहे असे निलंबन चालूच राहील तथापि अशा निलंबनाला सेवाविनियम 88 क व त्याबद्दलच्या इतर तरतुदी लागू राहतील.

4. ज्या कर्मचाऱ्यांचे बाबत सेवानिवृत्तीस 3 महिने किंवा त्यापेक्षा कमी दिवस शिल्लक असल्याने त्यांचेवर सेवाविनियम 90 अंतर्गत संक्षिप्त आरोपपत्र बजावण्यात आले असेल अशा कर्मचाऱ्यांचे बाबत प्रकरणाच्या गांभिर्यानुसार सेवाविनियम 88 अन्वये पुनश्च सविस्तर आरोपपत्र बजावण्यात यावे व सेवाविनिमय 88 मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे त्यांचे बाबतची कार्यवाही त्वरेने पूर्ण करुन कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तीपूर्वी शिस्तभंग कार्यवाही निर्णयाकिंत करावी.

5. ज्या प्रकरणामध्ये विनिमय 90 प्रमाणे कारवाई सुरु केली आहे व कसुरदाराने मा.न्यायालयापुढे त्याबद्दल दाद मागितली आहे किंवा ज्या मध्ये अंतरीम आदेश झालेला आहे अशा प्रकरणात विनिमय 88 प्रमाणे कार्यवाही करण्याची तरतूद ठेवून वकीलाच्या सल्ल्याप्रमाणे न्यायालयीन प्रकरण बंद करण्याची विनंती मा. न्यायालयास करण्यात यावी. ज्या प्रकरणी मा. न्यायालयाचे आदेश कंपनी विरुध्द झाले असतील अशा प्रकरणी विधी सल्लागारांच्या सल्ल्यानुसार सेवाविनिमय 88 प्रमाणे कारवाई चालू करावी.

उपरोक्त निर्देशाप्रमाणे प्रत्येक सक्षम अधिकाऱ्यांच्या पातळीवर सेवा विनियम 90 अनुसार देण्यात आलेल्या सर्व आरोपपत्रांचे पुनर्विलोकन करणे गरजेचे आहे.

मुख्य विधी सल्लागार

CGM (T/E)
G.M. (HRMS)
G.M. (HR-PLG.)
G.M. (HR)
Dy. EE (HRD)
MGR. (HR-PA Cell)

प्रत सस्नेह रवाना :
मुख्य महा व्यवस्थापक (मासं) म.रा.वि.वि.कं.म.,मुंबई.
कृपया गरजेनुसार सदर निर्देश आपल्या स्तरावरुन सर्व सक्षम अधिकाऱ्यांना निर्गमित करण्यात यावेत.

LEGAL SECTION
HONGKONG BANK BLDG., 3RD FLOOR, M.G.ROAD, FORT, MUMBAI-400 001
PHONE: 2261 9100, 2261 9200, 2261 9180 /FAX :2269 1128/ E-mail: lawofficer@mahadiscom.in